# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

पनवेल (      ) लोकसभा निवडणूकीत संपूर्ण देशात कॉंग्रेस पक्षाला आलेल्या अपयशाने खचून न जाता नवी उमेद घेवून विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून पुन्हा लोकांच्या समोर जाऊ आणि कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून झालेला विकास जनतेला समजावून सांगू असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयात आयोजित आढावा बैठकीत केले. येत्या पंधरवडयात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या नियोजनासाठी कार्यकर्त्यांची आढावा बैठक सोमवारी (दि.१९) आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर  कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, येत्या पंधरवडयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून २८ मे रोजी सायंकाळी ०५ः३० वाजता प्रख्यात विचारवंत खासदार डॉ.भालचंद्र मुणगेकर यांचे 'कॉंग्रेस समोरील आव्हाने आणि तरूणांवरील जबाबदारी' या विषयावर महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटी अंतर्गत रायगड जिल्हा विचारमंच, पनवेल तालुका व शहर कॉंग्रेस कमिटी यांच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी व पनवेल परिसरातील नागरिकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळच्या वतीने २९ मे ते १ जून या कालावधीत राजीव गांधी सुवर्ण चषक कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे त्याचबरोबर पनवेल नगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाचे उद्घाटन सोहळा राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते तसेच  सहकार, पणन व संसदीय कार्य मंत्री हर्षवर्धन पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, आणि सिने नाटय अभिनेते प्रशांत दामले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. १ जून रोजी सीकेटी महाविद्यालयात रक्तदान शिबीर व रक्ततुला करण्यात येणार आहे त्याचप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याची महती सांगणारे ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे संपादित 'गौरव ग्रंथाचे' प्रकाशन करण्यात येणार आहे. २ जून ते ५ जून दरम्यान खारघरमधील सेक्टर ११ येथे ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांचे रामायणावर आधारित रामकथा प्रवचन व पारायण सप्ताह कार्यक्रम रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, उरण - पनवेल वारकरी सांप्रदाय, संत तुकोबाराय चॅरिटेबल ट्रस्ट खारघर, माऊली चॅरिटेबल ट्रस्ट खारघर, वामनबुवा दिंडी सोहळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती देऊन या विविध कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये हिरीरीने भाग घेऊन सर्व कार्यक्रम यशस्वी करावे असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांना सांगितले.

या बैठकीत जिल्हाध्यक्ष आर.सी.घरत, उपाध्यक्ष जी.आर.पाटील, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, तालुका कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील, कॉंग्रेस विचारमंचाचे जिल्हा अध्यक्ष कांतीलाल कडू, सोशल मिडीया सेलचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, पक्ष प्रवक्ते सिराज सय्यद यांनीही मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करून बैठकीत विविध विषयांवर चर्चा घडवून आणली. या बैठकीस पक्ष प्रवक्ते व पनप शिक्षण मंडळाचे सभापती वाय्.टी.देशमुख, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, माजी उपनगराध्यक्ष संतोष शेट्टी, गणेश पाटील, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शिरवली विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.